जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १३० मधील उपकलम [४] मधील खंड [अ] च्या अनुषंगाने ग्रामीण बँकांच्या ठेवींच्या प्रमाणपत्रांस सार्वजनिक कर्ज रोखे म्हणून मान्यता देणे.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास विभाग
परीपत्रक क्रमांक संकीर्ण/१०९०/१९७५/२३
मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक - ११ मे १९९२

वाचा :- १] परिपत्रक ग्रा.वि.वि.क्रमांक-झेडपीए १०६३/३४५२५/डी-१, दि. २ सप्टेंबर १९...

२] परिपत्रक ग्रा.वि.वि.क्रमांक-आय एनव्ही १०७२/३०९९१-डी-१ दि. २ सप्टें.१९७२

३] परिपत्रक ग्रा.वि.वि.क्र.आय एनव्ही १०७२/८९५८-डी-१ दि. १६ ऑक्टो १९७२

४] शा.नि.क्र.झेडपीए १०८५/सीआर २८९८/२८, दिनांक ४ नोव्हेंबर १९८५

-परिपत्रक-

जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम १३० अन्वये ठेवी रकमा ज्या कोणत्या व ज्या पध्दतीने गुंतविण्यासाठी आणि शासनाने निर्देशित केलेले कर्ज रोखे यात रक्कम गुंतविता येते, आतापर्यंत वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया युनिटस नॅशनल सेविंग सर्टिफिकेटस राज्य विद्युत मंडळाचे कर्ज रोखे, हौसिंग डेव्हलपमेंट फायनान्स कार्पोरेशन [एच.डी.एफ.सी] चे रोखे व ठेवी प्रमाणपत्रे सार्वजनिक कर्ज रोखे म्हणून शासनाने घोषित केले होते.

२. ग्रामीण भागातील रोजगार संबंधीच्या योजनांना पत पुरवठा करणाऱ्या ग्रामीण बँकाकडे जिल्हा परिषदांना ठेवींच्या प्रमाणपत्रामध्ये गुंतवणूक करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. या संदर्भात केंद्र शासनाने ही त्यांच्या पत्र क्र. एफ ८ [६५] ८९ आरआरबी दिनांक २३-७-९० अन्वये ग्रामीण बँकामध्ये अधिकात अधिक ठेवी ठेवाव्यात अशा सूचना दिलेल्या आहेत. ग्रामीण बँकामधील केंद्र शासनाचा आणि राज्य शासनाचा भांडवलातील हिस्सा पहाता शासनाने खालील प्रमाणे निर्णय घेतला आहे.

१] महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ च्या कलम १३१ अन्वये स्थापन करण्यात आलेल्या खास निधीमधील गुंतवणूकीसाठी असलेली रक्कम ग्रामीण बँकांच्या ठेवींच्या प्रमाणपत्रांत गुंतविण्यास जिल्हा परिषदांना परवानगी देण्यात आली. घसारा, पाणी पुरवठा देखभाल व दुरुस्ती निधी इत्यादी कलम १३१ खाली निर्माण केलेल्या निधी रक्कम अशारीतीने ग्रामीण बँकामध्ये ठेवीच्या स्वरुपात गुंतविण्यास हरकत नाही.

[२] महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम १९६१ च्या कलम १३० च्या उपकलम [४] मधील खंड [अ] च्या संदर्भात ग्रामीण बँकांच्या ठेवींच्या प्रमाणपत्रांस सार्वजनिक कर्जरोखे म्हणून मान्यता देण्यात येत आहे.

[३] घसारा, निधी; पाणी पुरवठा देखभाल दुरुस्ती निधी इत्यादी खास निधीची चालू खातीही जिल्हा स्तरावरील ग्रामीण बँकांच्या शाखेत तशी ती असल्यास उघडल्यास हरकत नाही.

३. वरील गुंतवणूका जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ मधील कलम १०९ अनुसार स्थायी समितीच्या परवानगीने करण्यात याव्यात.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने